# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०३/०८/२०२५
## अग्निशस्त्रांचा धाक दाखवुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक, ४ तासात जबरी चोरीचे २ गुन्हे उघड अग्निशस्त्रांसह ८,३२,०८०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बुटीबोरी आणि पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी येथे खालील प्रमाणे अज्ञात आरोपी विरूध्द दोन जबरी चोरीचे गुन्हे नोंद असुन अवध्या ४ तासात नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा नागपुर ग्रामीण पोलीसांनी शोध घेतला.**

**पोलीस स्टेशन बुंटीबोरी :—** दिनांक ०२/०८/२०२५ रोजीचे दुपाररी ०१.४५ वा. दरम्यान बुटीबोरी पोलीस ठाणे अंतर्गत स्टेंट बॅक जवळ फिर्यादी विशाल अशोक निनावे, रा. जुनी वस्ती, बुटीबोरी हे त्यांचे दुचाकी ने स्टेट बॅक ऑफ इंडीया येथे नगदी १५,०००/— रूपये भरण्यासाठी निघाले असता बॅके समोर सातगावचे दिशेने ३ अज्ञात आरोपीतांनी ( अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील ) एक लाल रंगाचे स्विफ्ट कारने येवुन फिर्यादीला देशी कट्टयाचा धाक दाखवुन फिर्यादीचे पॅन्टचे खिश्यातील १५,०००/— रूपये जबरीने हिंसकावून नेले. सदर घटनेसंदर्भात पोलीस ठाणे बुटीबोरी येथे अप क्रं ७२७ /२०२५ कलम ३०९ (४), ३ (५) भान्यासं सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बुंटीबोरी:—**बुटीबोरी हद्दीतील घटनेनंतर काही वेळताच एमआयडीसी बुटीबोरी अंतर्गत टाकळघाट येथे वार्ड क्रमांक ०४ मध्ये श्रीमती संगीता प्रभाकर वासाड यांचे शासनमान्य देशी दारूचे दुकानात दुपारी ०२.१० वा. ते ०२.१५ वा. दरम्यान फिर्यादी युगल प्रभाकर वासाड, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, टाकळघाट यांना३ अज्ञात आरोपीतांनदेशी कट्टयाचा धाक दाखवुन फिर्यादीचे काऊन्टरमध्ये ठेवलेले नगदी १५०००/— रू. व आयफोन १२ कि. ४०,०००/— रू. जबरीने चोरून नेले. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी येथे अप क्रं ३२६ /२०२५

कलम ३०९ (४), ३ (५) भान्यासं सह कलम ३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा.श्री. हर्ष ए.पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री. दीपक अग्रवाल सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर उपविभाग यांचे नेतृत्वात बुटीबोरी पोलीस ,एमआयडीसी बोरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची विविध पथके तयार करून नमुद अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेकामी रवाना करण्यात आले. सर्व पथकांनी कसुन तपास करीत गोपनीय बातमीदार तसेच तांत्रिक पुराव्याच्या मदतीने आरोपीतांचा शोध घेतला असता सदरचे आरोपी हे वर्धा जिल्हयाकडे रवाना झालेअसुन संशयीत वाहनाने नमुद आरोपी हे वर्धा शहरातील जामा मस्जीद चौक परीसरात फिरत असल्याचे समजले. त्यावरून आरोपीतांची आणि वाहनाच्या वर्णनाची माहिती नागपुर ग्रामीण पोलीसांनी वर्धा पोलीसांना दिली. स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांच्या मदतीने सदर गुन्हयातील आरोपी क्रं **१) कुणाल सुरेश हेमने, वय २८ वर्षे, रा घर क्रं ९७९८,प्लॉट क्रं १९४, आझाद नगर, बिडगाव नागपुर, आरोपी क्रं २) रविंद्रसिंग लखनसिंग जुनी, वय ३१ वर्षे, रा कारला चौक, हनुमानगढ, वर्धा, आरोपी क्रं ३) मंथन महादेव मोहर्ले, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्रं ४ बुटीबोरी , जि. नागपुर, आरोपी क्रं ४) तुषार दामोधर सहारे, वय २६ वर्षे, रा दुर्गा मंदीर, बुटीबोरी, जि. नागपुर आणि आरोपी क्रं ५) नयन दत्तु कडु, वय २६ वर्षे, रा संयोग कॉलनी, कारला रोड, पिपरी वर्धा हे पाच आरोपीजामा मस्जीद चौक परीसर, वर्धा येथे मिळूनआल्याने नमुद पाचही आरोपीतांना दिनांक ०३/०८/२०२५ रोजी ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातून १) एक गावठी बनावटीचे माउजर, २) एक देशी बनावटीचा कट्टा ३) एक नकली पिस्टल, ४) दोन खाली मॅगझीन, ५) चार नग अॅड्रॉईड मोबाईल, ६) ४१,९८० /— रूपये रोख रक्कम आणि ७) गुन्हयात वापरलेली चारचाकी वाहन लाल रंगाची स्विफ्ट क्रमांक एम.एच ३२ ए. एक्स. ३८३१ असा एकुण ८,३२,०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

सदर प्रकरणात पोलीस स्टेशन बुटीबोरी, एमआयडीसी बुटीबोरी ,स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण आाणि स्थानिक गुन्हे शाखा वर्धा जिल्हा च्या विशेष पथकानेकौशल्यपुर्ण आणि शास्त्रोक्त पध्दतीने तपास करून तांत्रिक पुराव्यांचा वापर करून अवघ्या ०४ तासाचे आत वर नमुद गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणला.